ePaper

|| वर्ष - 8 | अंक - 21 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 26 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लोकसभेला बिनशर्त, विधानसभेला स्वबळ; राज ठाकरे कोणाला डॅमेज करणार?



### आतील पानांत

- भारताच्या लेकींनी केली कमाल
- आम्ही कायम एकमेकांसाठी असतो
- माधुरीने बनवली कांदा भजी!
- कंगनाची खासदारकी धोक्यात?

### पावसाची विश्रांती, पण पुराच्या पाण्याने घरात चिखल

# नुसतं लढं म्हणा..!

## » पुणेकरांची रात्र वैऱ्याची, पिण्याच्या पाण्याचेही हाल

। पुणे । महाईन्यूज

**‘पुराचे पाणी शिरल्याने घरात सगळा चिखल झाला असून, आता पुन्हा सगळा संसार उभा करण्याशिवाय पर्याय नाही. इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि गृहोपयोगी वस्तू नव्याने घ्याव्या लागतील किंवा त्यांची दुरुस्ती करावी लागेल,’ कुटुंबियांसोबत घरात साचलेला चिखल काढताना अनेक पुणेकर सांगत होते; तर पुराच्या पाण्यामुळे किराणा दुकानातील सर्व वाण सामान, साहित्य भिजल्याने झालेल्या नुकसानाचा हिशोब करताना हताश झालेल्या गृहिणी ‘आता पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागेल,’ असे म्हणत होत्या.**



मुसळधार पाऊस आणि खडकवासला धरणातून मुठा नदीत सोडलेल्या विसर्गामुळे सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी, निंबज नगर, विठ्ठल नगर परिसरातील नदीकाठच्या अनेक सोसायट्या, अपार्टमेंटमध्ये मध्यरात्रीपासून पाणी साचण्यास सुरुवात झाली. पहाटेपर्यंत तळमजल्यावर असलेल्या सदनिका आणि पार्किंगमध्ये पाणी शिरल्याने स्थानिक रहिवाशांची झोप उडाली. ‘पहाटे तीन वाजता पाणी शिरू लागले अन् पाहता पाहता पार्किंगमध्ये पाणीपातळी छातीपर्यंत वाढली. मध्यरात्रीपासूनच वीजपुरवठा खंडित आहे. त्यामुळे मोबाइलही ‘डिस्चार्ज’ आहे. वाहने अगोदरच लांब चौकात लावून ठेवल्याने वाचली,’ अशी ‘आपबीती’ श्रीगणेश अपार्टमेंटमध्ये राहणारे सुनील चव्हाण सांगत होते.

### ‘रात्रीपासून गेली वीज’

‘एकतानगरीतील इमारतीत पहिल्या मजल्यावर मी राहतो. रात्री दोन वाजल्यापासून वीज गेली. त्यानंतर लोकांचा आरडाओरडा ऐकू येत होता. पहाटेपर्यंत पार्किंगमध्ये गुडघ्याएवढे पाणी साचले. कुटुंबीय गावाला गेले असल्याने घरी मी एकटाच होतो. बचावकार्य करणाऱ्यांनी मला पाण्यातून सुरक्षित बाहेर काढले. जनता वसाहतीत माझा दवाखाना असून, आता तिथेच मुक्काम करणार आहे,’ असे डॉ. कैलास चरखा यांनी सांगितले.

### बोटीने सुरक्षितस्थळी आणले

पुणे महापालिका व ‘पीएमआरडीए’चे अग्निशमन दल, ‘एनडीआरएफ’, लष्कराच्या मराठा लाइट इन्फंट्रीच्या जवानांनी नागरिकांच्या बचावासाठी एकतानगरी परिसरात तातडीने धाव घेतली. पाणी शिरलेल्या सोसायट्यांमध्ये अडकलेले ज्येष्ठ नागरिक, महिला व मुलांना बोटीने सुरक्षित ठिकाणी आणले. शिवपुष्प पार्क चौकापासून एकतानगरीकडे जाणारी वाहतूक पोलिसांनी बंद केली होती. आनंद पार्क सोसायटीत राहणाऱ्या स्नेहल केसकर यांनी, प्रशासनाने आधीच माहिती न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. ‘आम्ही पहाटे साडेतीनपासून जागेच आहोत. पाणी शिरायला सुरुवात झाल्यावर सर्वप्रथम वाहने पार्किंगमधून काढून वरच्या चौकात लावली. साडेपाचच्या सुमारास जिन्यात पाणी आले. घरापासून अवघ्या पाच पायऱ्यांवर पाणी होते. संसारोपयोगी वस्तू कशा सांभाळायच्या, अशी चिंता सतावू लागली. धरणातून विसर्ग करताना पाणी शिरणार असेल, तर प्रशासनाकडून खबरदारीचा इशारा दिला जातो. या वेळी काहीच सांगितले नाही.

### नेहरूनगरमध्ये भिंत कोसळली

नेहरूनगर येथील झिरो बॉईज चौकालगत जुनी भिंती कोसळली. दगड व मातीची भिंत होती. त्याखाली चार दुचाकी आणि दोन चारचाकी वाहने अडकली होती. त्यांचे नुकसान झाले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांकडून जेसीबीच्या साह्याने राडारोडा बाजूला करण्याचे काम सायंकाळपर्यंत सुरू होते. झाडाच्या मुळ्या वाढलेल्या होत्या. त्यामुळे तडे पडून भिंत पडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

### तरुणांचे प्रसंगावधान

एकता नगर परिसरात पुराचे पाणी शिरल्याने अनेक जण अडकले होते. त्यांना सुखरूप ठिकाणी जाता यावे, यासाठी अनेक जण प्रयत्न करीत होते. सनसिटी रस्ता परिसरातील अजय शितोळे आणि त्याच्या मित्रांनी परिसरातील झाड आणि खांबांना दोरी बांधून पाण्यातून बाहेर पडणाऱ्या नागरिकांना मदतीचा हात दिला.

# राञ दिन आम्हा युद्धाचा प्रसंग!

## अग्निशमन दलाच्या जवानांचे काम ठरले कौतुकास पात्र

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे बुधवारी मध्यरात्रीनंतर वेगवेगळ्या भागात पाणी शिरण्याच्या घटना घडल्या. वसाहतीत पाणी शिरल्यानंतर तातडीने रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलविणे, तसेच वेगवेगळ्या भागात झाडे कोसळण्याच्या घटना घडल्यानंतर तातडीने धाव घेऊन मदतकार्य करणाऱ्या अग्निशमन दलाच्या जवानांचे काम कौतुकास पात्र ठरले. पाणी शिरलेल्या भागात तातडीने मदतकार्य करून जवानांनी २५४ जणांची सुटका केली.**



शहरात बुधवारी रात्रीनंतर मुसळधार पाऊस सुरू झाला. सलग बारा तास मुसळधार पाऊस झाल्याने शहरातील वेगवेगळ्या भागात पाणी शिरण्याच्या घटना घडल्या.

गुरुवारी सायंकाळी पाचपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात ७८ ठिकाणी झाडे पडली. सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी सोसायटीसह शहरातील २५ ठिकाणी पाणी शिरण्याच्या घटना घडल्या. मुसळधार पावसामुळे जुन्या घराच्या भिंत पडण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. बुधवारी रात्रीपासून अग्निशमन दलाच्या २० अधिकाऱ्यांसह २०० जवान मदतकार्यात सहभागी झाले होते. वेगवेगळ्या भागात झाडे कोसळणे, तसेच पाणी शिरण्च्या घटना एकापाठोपाठ घडल्याने धावपळ उडाली, असे अग्निशमन दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी सांगितले.अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण केंद्रातील दूरध्वनी रात्रभर खणाणत होते. नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांनी मदतकार्यात भूमिका बजावली. त्वरीत अग्निशमन दलाचे बंब, जवानांना घटनास्थळी रवाना करण्याच्या सूचना देण्यात आला.

पावसाळ्यातील दिवस म्हणजे अग्निशमन दलाच्या जवाानांच्या दृष्टीने युद्धाचे प्रसंग असतात, असे त्यांनी नमूद केले. भिडे पुलासह शहरातील भुयारी मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. काही रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक बंद करून पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. भिडे पूल, जयंतराव टिळक पूल, होळकर पूल, शांतीनगर पूल, मांजरी पूल वाहतुकीस बंद करण्यात आले होते. तेथे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पाणी शिरलेल्या भागात पोलिसांनी ध्वनीवर्धकावरुन सूचना दिल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी सहकार्य करून तातडीने रहिवाशांना तातडीने सुरक्षितस्थळी हलविले. काही भागात रस्त्यावर पाणी साचले होते. या भागातील ड्रेनेजमध्ये पाण्याचा निचरा होण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले. महापालिका कर्मचाऱ्यांना या बाबतची माहिती देऊन वाहतूक सुरळीत केली.शहरात बुधवारी रात्रीनंतर मुसळधार पाऊस सुरू झाला. सलग बारा तास मुसळधार पाऊस झाल्याने शहरातील वेगवेगळ्या भागात पाणी शिरण्याच्या घटना घडल्या. गुरुवारी सायंकाळी पाचपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात ७८ ठिकाणी झाडे पडली. सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी सोसायटीसह शहरातील २५ ठिकाणी पाणी शिरण्याच्या घटना घडल्या.

### पोलिसही मदतकार्यात सहभागी

मुसळधार पावसामुळे जुन्या घराच्या भिंत पडण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. बुधवारी रात्रीपासून अग्निशमन दलाच्या २० अधिकाऱ्यांसह २०० जवान मदतकार्यात सहभागी झाले होते. वेगवेगळ्या भागात झाडे कोसळणे, तसेच पाणी शिरण्च्या घटना एकापाठोपाठ घडल्याने धावपळ उडाली, असे अग्निशमन दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी सांगितले.अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण केंद्रातील दूरध्वनी रात्रभर खणाणत होते.

# पिंपरी-चिंचवडमधील १५ रस्त्यांवरील वाहतूक बंद

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ परिसर तसेच पिंपरी – चिंचवड शहरात मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्याने ठिकठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून १५ रस्त्यांवरील वाहतूक बंद केली.**



स्थिती पूर्ववत होईपर्यंत ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.आळंदी ते चाकण रोडवरील केळगाव बायपास पूल, चाकण पूल, नगरपरिषद पुलावर पाणी आल्याने या पुलावरून दोन्ही बाजूच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला. ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. पुण्याकडून येणारी वाहनांनी देहूफाटा चौक डावीकडे वळून मोशी मार्गे इच्छितस्थळी जावे. चर्होली फाटा येथे उजवीकडे वळून पीसीएस चौक, मरकळ चौक, चाकण चौक मार्गे इच्छितस्थळी जावे. चाकणकडून येणारी वाहतूक चाकण चौक – मरकळ चौक – पीसीएस चौकातून उजवीकडे वळून चर्होली फाटा मार्गे इच्छितस्थळी जाईल. तळेगाव तळे भरल्याने तळेगाव गावठाणाकडून सोमाटणे गावाकडे जाणारा रस्ता बंद केला असून, नागरिकांनी लिंब फाटा – तळेगाव खिंड – सोमाटणे फाटामार्गे जावे. तळेगाव दाभाडे येथे हिंदमाता भुयारी मार्गात पाणी भरल्याने सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यासाठी नागरिकांनी काका हलवाई चौक स्टेशन चौक मार्गे जावे. मरकळ ते शिक्रापूर रोडवरील मरकळ पूल वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. नागरिकांनी मरकळ गावात डावीकडे वळून कोयाळी कमानीकडून शेलपिपळगाव – रसिका हॉटेल मार्गे इच्छितस्थळी जावे.

### ड्रम लावून वाहतुक बंद

चाकण – म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत निघोजे – फलके वस्ती येथील ओढ्यावरून पाणी वाहत असल्याने फलके वस्ती ते मोई गावाकडे जाणारा रस्ता ड्रम लावून वाहतुकीस बंद करण्यात आला आहे.चाकण येथील चक्रधर रोड ते भुजबळ आळी रस्ता वाहतुकीस बंद आहे. हा रस्ता हा अंतर्गत असल्याने वाहतूक इतर अंतर्गत रस्त्याने वळविण्यात आली आहे.

# पवना धरण क्षेत्रात अतिमुसळधार पाऊस!

## धरण 70 टक्के भरले, यंदाच्या वर्षी आत्तापर्यंत 1596 मि.मी. पावसाची नोंद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवना धरण परिसरात गेल्या २४ तासांमध्ये तब्बल ३७४ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे आज (दि.२५) सकाळी ८ वाजेपर्यंत धरण साठ्यात १४.९८ टक्के इतकी वाढ झाली आहे. सध्या धरणातील पाणीसाठा ६९.११ टक्के इतका झाला आहे. बुधवारी पवना धरणात ५४.१३ टक्के इतका पाणीसाठा होता. मात्र धरण क्षेत्रात (दि.२५) सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तासांत ३७४ मि.मी. इतका विक्रमी पाऊस झाला आहे.**



तर यंदाच्या वर्षी आत्तापर्यंत १५९६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे एकाच दिवसात धरणातील पाणीसाठ्यात १४.९८ टक्के इतकी वाढ होऊन सध्या धरणातील पाणीसाठा ६९.११ टक्के इतका झाला आहे. अजूनही पवना धरण क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पवना नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी आज पुणे जिल्ह्यातील सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदिर पाण्यात..

गेल्या २४ तासांत लोणावळा परिसरात तब्बल ३७५ मिलीमिटर पावसाची नोंद झाली आहे. सतत सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे थेरगाव येथील केजूबाई बंधारा, पुनावळे येथील बंधारे ओसंडून वाहत आहेत. पवना नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची वाढ झाली असून चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदिरात पाण्यात गेले आहे. कालपासून पावसाची संतधार सुरु आहे. पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण ७० टक्क्यांपर्यंत भरले आहे. शहरातील अनेक भागातील रस्ते जलमय झाले आहेत. शहराच्या विविध भागात पाणीच पाणी झाले आहे. पवना नदीतील पाण्याच्या पातळीत जोरदार वाढ होत आहे. सतर्कतेचा इशारा म्हणून पिंपरी चिंचवड सह जिल्ह्यातील सर्व शाळांना जिल्हा प्रशासनाने सुट्टी जाहीर केली आहे. थेरगाव येथील केजूबाई बंधारा तुडूंब भरून वाहू लागला आहे. तसेच पुनावळे येथील बंधाराही ओसांडून वाहत आहे. त्यामुळे चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदीर अर्धे पाण्यात गेले आहे. कालपासून संततधार सुरू असल्यामुळे पाणी शिरले असून परिसरातील नागरिक हे पाणी पाहण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

# चिखली-घरकूलमधील नागरिकांना आमदार लांडगेंचा 'विश्वास'

## महापालिका, पोलीस प्रशासनसोबत 'ऑन फिल्ड' पाहणी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अतिमुसळधार पावसामुळे चिखली- घरकूल परिरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे नागरिक अडकून पडले असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी आपत्तीग्रस्त नागरिकांची महापालिका आपत्ती व्यवस्थान विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासनाचे अधिकारी यांच्यासोबत भेट घेतली. परिसराची पाहणी करुन नैसर्गिक आपत्तीच्याकाळात आपत्तीग्रस्त नागरिकांना सर्वोतोपरी मदत करण्याचा 'विश्वास' दिला.**



गेल्या दोन दिवसांत पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यात अतिमुसळधार पाऊस पडत आहे. पवना धरणक्षेत्रात तसेच इंद्रायणी आणि मुळा नदी प्रवाहापेक्षा जास्त पाणी वाहत आहे. वाढलेले नागरीकरण आणि प्रमाणापेक्षा जास्तीचा पाऊस झाला असून, धरणांमधून विसर्ग केल्यामुळे सखल भागांमध्ये, रस्त्यांवर पाणी साचले आहे. काही नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले आहे. चिखली घरकूल परिसरात पावसाने थैमान घातले असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे.

चिखली घरकुल प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. पेठ क्रमांक १७ आणि १९ येथील घरकुल वसाहतीतील नागरिकांना मोठा फटका बसला असून, या पाण्याचा निचरा करण्यासाठी मोठ्या व्यासाच्या पाईपलाईनद्वारे या पाण्याचा विसर्ग करण्याची सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली. तसेच, नागरिकांना आपत्तीच्या काळात मदतकार्य करावे, अशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे आणि सहकारी उपस्थित होते.

### नैसर्गिक आपत्तीत राजकीय जोडे बाजुला ठेवा

महानगरपालिकेचा आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्वयंसेवी संस्था, संघटना आपआपल्या परीने मदत कार्य करीत आहेत. नागरिकांना या नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतीची नितांत गरज आहे. यासाठी राजकीय जोडे बाजुला ठेवून प्रत्येकाने पुढाकार घ्यावा. सर्व पक्षीय राजकीय नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना माझी नम्र विनंती आहे की, नैसर्गिक आपत्तीच्या काळात कोणताही राजकीय रंग न दाखवता समाजिक बांधिलकीतून मदतकार्यासाठी पुढाकार घ्यावा. राजकीय टीका-टीपण्णीसाठी नैसर्गिक आपती हे व्यासपीठ होवू नये. नागरिकांना टीका-टीपण्णीची नव्हे, तर मदतीची आवश्यकता आहे, असे आवाहनही आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.

" पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसरात गेल्या दोन दिवसांपासून अतिमुसळधार पाऊस बरसला आहे. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली घरकूल सारख्या सखल भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी, वाहतूक पोलीस आणि स्थानिक नागरिकांसह या भागात पाहणी केली. घरकूलमधील नागरिकांना सर्वोतोपरी मदत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आपत्तीच्या काळात नागरिकांनी मदतीसाठी सारथी हेल्पलाइन: 8888006666 परिवर्तन हेल्पलाइन: 9379909090 संपर्क करावा, असे आवाहन करतो.

**– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, पिंपरी-चिंचवड.



## भूमिका

**परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या आरोपांवरून संसदेपर्यंत घमासान चर्चा झडल्या, नीट' परीक्षेबाबतचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी जाहीर केला. यंदाची 'नीट' रद्द होणार नाही आणि पुन्हा घेतलीही जाणार नाही,' हे न्यायालयाने स्पष्ट केले. 'नीट'च्या निकालात गैरप्रकार झाले किंवा पूर्ण यंत्रणेचेच पद्धतशीर उल्लंघन झाले, असा निष्कर्ष काढण्याएवढा सबळ पुरावा नाही.**

# सर्व काही 'नीट' सुरु आहे?



किंबहुना फेरपरीक्षा घेतल्यास त्याचा या विद्यार्थ्यांना फटका बसेल, असे न्यायालयाचेच निरीक्षण आहे. काही ठिकाणी पेपरफुटी झाल्याचे स्पष्ट झाले असले आणि त्यामुळे परीक्षेवर शंका घ्यायला वाव असला, तरी प्रामाणिकपणाने परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या त्यापेक्षा किती तरी जास्त असणार आहे. शिवाय, पेपरफुटी व्यापक होती, असेही सिद्ध होत नसल्याने पुन्हा नव्याने सगळी प्रक्रिया पार पाडणे फारच जिकिरीचे होऊन बसले असते. वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या वेळापत्रकावर परिणाम होऊन पुढे यंदाच्या शैक्षणिक वर्षालाच बसू शकणारा फटका, आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांची होऊ शकणारी गैरसोय, भविष्यात वैद्यकीय व्यावसायिकांच्या उपलब्धतेवर होऊ शकणारा परिणाम आदी मुद्दे निरीक्षणांच्या स्वरूपात न्यायालयानेच मांडले आहेत. परिणामी, आला तो निकाल योग्यच.मात्र, या निकालामुळे परीक्षा व्यवस्थेबाबत निर्माण झालेले प्रश्न संपलेले नाहीत. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी न्यायालयाच्या निकालावर दिलेली प्रतिक्रिया ही त्या दृष्टीने तपासायला हवी. 'विरोधक विद्यार्थ्यांची दिशाभूल करत होते,' वगैरे म्हणणे राजकीयदृष्ट्या एक वेळ ठीक, पण 'विरोधक अराजक माजविण्याचा प्रयत्न करत होते, त्यांनी देशाचा अपमान केला आहे,' अशी पुष्टी जोडणे आततायीपणाचे.'नीट' पुन्हा घेण्यात यावी, या याचिकेवरील सुनावणीदरम्यान यंदाच्या 'नीट'मध्ये झालेल्या गैरप्रकारांवर पुरेसा प्रकाश पडलेला असताना आणि तो केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागासारख्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतीलच तपास संस्थेने मांडलेला असताना, त्याबाबत प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कामच आहे. हजारीबागमध्ये पेपर फोडणाऱ्याने प्रश्नपत्रिका ठेवलेल्या शाळेच्या खोलीत प्रवेश करून तेथून प्रश्नपत्रिकेची छायाचित्रे काढून नंतर त्या प्रती कशा वितरित केल्या, याची साद्यंत माहिती केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानेच मंगळवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात दिली आहे. अशा वेळी उपस्थित झालेल्या प्रश्नांवर समर्पक उत्तरे देण्याऐवजी शिक्षणमंत्र्यांनी अशी टिप्पणी करणे यातून एकूण परीक्षा यंत्रणेत सुधारणा करण्याचा मानस पुरेसा स्पष्ट होत नाही, हे उघड आहे.नीट'मध्ये ६७ विद्यार्थ्यांचे पैकीच्या पैकी गुण, १,५६३ विद्यार्थ्यांचे वाढीव गुण आणि वेगवेगळ्या राज्यांतून सापडलेले या परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडण्यात सहभागी असलेले आरोपी यामुळे परीक्षेवर गंभीर सावट होते. सुनावणीदरम्यान वाढीव गुण रद्द करून ते मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घ्यावीच लागली. ती ज्यांनी दिली नाही, त्यांचे वाढीव गुण कमी झाले आणि ज्यांनी दिली, त्यानंतर पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्यांची संख्या ६७ वरून ६१ झाली! त्याचप्रमाणे अन्य एका प्रश्नाच्या योग्य उत्तरासाठी तज्ज्ञांची समितीही नेमावी लागली. एकीकडे 'नीट'वर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना, या परीक्षेचे संचालन करणाऱ्या राष्ट्रीय चाचणी संस्थेनेच यूजीसी-नेट ही परीक्षा गैरप्रकार झाल्याच्या शंकेमुळे पुढे ढकलली होती. या सर्व बाबी परीक्षा यंत्रणेत असलेल्या गंभीर त्रुटी स्पष्ट करणाऱ्या आणि त्या वेळीच दुरुस्त करण्यासाठी पावले उचलण्याची गरज अधोरेखित करणाऱ्या आहेत. 'नीट'मधील घोळापाठोपाठ पुढे आलेल्या प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या प्रकरणामुळे 'यूपीएससी'सारख्या संस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले आहे. करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व काही पारदर्शकपणे पार पडेल, याचा दिलासा देण्याची जबाबदारी सरकारची आहे, हे सरकारने विसरू नये. विरोधकांनीही लक्षात घेण्याचा एक मुद्दा. 'एक देश, एक परीक्षा' हे सूत्र संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असतानाच पुढे आले होते आणि त्यातूनच 'नीट' ही वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांसाठीची एकमेव प्रवेश परीक्षा असेल.

## प्रासंगिक »

### आठवेल का सारे...

***निर्गुंतवणुकीऐवजी रिझर्व्ह बँकेच्या लाभांशावर मदार, काँग्रेसी 'न्याय'छाप रोजगार योजना आणि म्युच्युअल फंड परताव्यांवर करवाढ ही कशाची लक्षणे?***

अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने आपली अवस्था अर्थव्यवस्थेच्या मुद्द्यावर ना इकडे ना धड तिकडे अशी झाली. सार्वजनिक उपक्रम नावाने केंद्र सरकारने जनतेच्या पैशाने जे काही उपक्रम सुरू केले ते पांढरे हत्ती ठरले आणि या सरकार-केंद्री विकासधोरणामुळे आपण खासगी उद्योजकांसही पूर्णपणे उत्तेजन देऊ शकलो नाही. वास्तविक पं. नेहरू यांस मिश्र व्यवस्थेचा आधार घ्यावा लागला कारण नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशात भांडवलदारांची संख्या मूठभरही नव्हती आणि जागतिक भांडवलदारांस देशात गुंतवणूक करण्याइतका विश्वास नव्हता. त्यामुळे सरकारपुढे स्वतःच भांडवल ओतण्याखेरीज अन्य काही पर्याय राहिला नाही. तशाही परिस्थितीत होत्या त्या खासगी उद्योजकांस मोकळे रान दिले असते तर आता जसा दोन उद्योगगृहांची धन करणारी धोरणे आखत असल्याचा आरोप विद्यामान सरकारवर होतो.

भारतीय अर्थव्यवस्थेने २०२३-२४ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर ८.२ टक्के नोंदवला आणि बहुतेक अंदाजांनुसार तो चालू आर्थिक वर्षात (२०२४-२५मध्ये) सात टक्क्यांच्या वर राहण्याची शक्यता आहे, असे आपण केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात ऐकले.

# दिलाशाची आशा अर्थसंकल्पाने फोलच ठरवली

ही उत्साहवर्धक बातमी! पण कृषी क्षेत्रातील वाढ २०२२- २३ मधील ४.७ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये १.४ टक्क्यांवर घसरलेली आहे. या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात शेतीला मोठा दिलासा मिळेल अशी आशा होती, ती आता फोल ठरली आहे.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'विकसित भारत @२०२४' चा पाठपुरावा करण्यासाठी एक 'रोडमॅप' (हा त्यांचाच शब्द) प्रदान केला आहे. त्यासाठी नऊ प्रमुख प्राधान्य क्षेत्रांचा उल्लेख सीतारामन यांनी केला, त्यातही 'शेतीमधील उत्पादकता आणि लवचिकता (हवामान-रोधकता)' याचा उल्लेख पहिल्या स्थानावर होता! हीदेखील समाधानाचीच बाब आहे. पण हा उल्लेख प्रत्यक्षात येण्याची आशा एवढ्यातच का मंदावते आहे? शेतीला प्रोत्साहन देण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे कृषी संशोधनावर भर देऊन हे संशोधन शेतीच्या बांधापर्यंत पोहोचवणे. कृषी संशोधनाच्या 'सीमान्त परताव्याचा'- मार्जिनल रिटर्न्सचा- दर एकास दहा असा असतो, हे



जाणकारांना माहीतच असेल, पण तरी फोड करून सांगतो की, समजा शेती- संशोधनासाठी एक हजार कोटी रुपये खर्च केले, तर त्या संशोधनाचा प्रत्यक्ष पिकांना फायदा झाल्यानंतर १०,००० कोटी रुपयांची वाढ कृषी क्षेत्राच्या 'जीडीपी'मध्ये होत असते. अशा गुंतवणुकीमुळे कृषी क्षेत्राला उच्च विकासाच्या मार्गावर नेता आले असते.

परंतु अर्थसंकल्पीय खर्चाचे आकडे पाहाता, असा विचार झाल्याचे दिसत नाही. कृषी संशोधन आणि शिक्षण विभागाला (डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च ॲण्ड एज्युकेशन) यंदा ९९.४ अब्ज रुपये मिळाले आहेत, ही वाढ २०२३-२४ मधील (सुधारित अंदाजांनुसार) ९८.८ अब्ज रुपयांपेक्षा फक्त ०.७ टक्क्यांनी जास्त आहे. हे अपेक्षेपेक्षा कमी आहेच पण खरे तर वाढत्या गरजा पाहाता ही तथाकथित 'वाढीव' तरतूद आधीपेक्षाही कमीच पडणार आहे.आम्ही आदल्या काही अर्थसंकल्पांचा धांडोळा घेतला तेव्हा असे दिसून आले की २०२०-२१ मध्ये कृषी संशोधन आणि विकास खर्च १६० अब्ज रुपयांवर पोहोचला होता, त्यापैकी ८९ टक्के सार्वजनिक क्षेत्रातून आणि ११ टक्के खासगी क्षेत्रातून खर्च होणार होते. हे आकडे कृषी संशोधनाच्या व्याप्तीची कल्पना देत असले तरी, 'कृषी संशोधन सघनता' (ॲग्रिकल्चरल रीसर्च इन्टेन्सिटी – 'एआरआय') म्हणजेच अंदाजित कृषी-जीडीपीच्या तुलनेत संशोधनावर झालेल्या खर्चाची टक्केवारी विचारात घेणे महत्त्वाचे आहे. हा 'एआरआय' २००८-०९ मध्ये ०.७५ टक्क्यांवर पोहोचला होता आणि २०२२-२३ मध्ये ०.४३ टक्के होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये यात आणखी घसरण होईल, कारण या विभागातील वाटप प्रत्यक्षात कमी झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं चांगलं!

## मनोज जरांगेंचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना इशारा

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलांच चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी राज्य सरकारकडे केलेली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी मनोज जरांगे यांनी केलेली आहे. मात्र, त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजाने विरोध केला आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांसदर्भात लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केलेली आहे. सध्या मराठा आणि ओबीसी नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा तापला आहे.**





अशातच मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात एका प्रकरणात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. यावरून मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला. मला कारागृहात टाकल्यास भाजपाच्या सर्व उमेदवारांना निवडणुकीत पाडा, असं विधान मनोज जरांगे पाटील यांनी केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यावर प्रतिक्रिया दिली होती. यानंतर आज पुन्हा मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना इशारा दिला. "जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. एका प्रकरणात त्यांना अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे, याबाबत बोलताना मनोज जरांगे म्हणाले, "देवेंद्र फडणवीसांना हे माहिती नाही की याआधी १३ ते १४ वर्षात काहीच झालं नाही. मग असं अचानक काय झालं? मग मीच का? असे राज्यात किती गुन्हे आहेत? कारण दोन्हीही खाते तुमच्याकडे आहेत. मी गोरगरीबांसाठी लढतो म्हणून तुम्ही मला हेरलं का?", असा सवाल जरांगे यांनी केला."मला याबाबत आधी नोटीस दिली नव्हती. मी कायद्याचा सन्मान करणारा माणूस आहे. न्यायालयाचा अवमान कधीही आम्ही होऊ दिला नाही आणि पुढेही होऊ देणार नाहीत. पण आता आधी नोटीस दिली नाही, थेट वॉरंट काढलं. बर वॉरंट जरी काढलं असलं तरी त्या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. माझा संबंध नसला तरी मला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरु आहे. देवेंद्र फडणवीसांचा मला उघडं पाडण्याचा हा प्रयत्न आहे. पण त्यांनी हे काम करू नये, आमचे लोक फोडून त्यांना पत्रकार परिषदा घ्यायला लावू नये. आता तुम्ही जेवढं गोडी गुलाबीने

### मी गोरगरीबांसाठी लढतो

"जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.एका प्रकरणात त्यांना अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे, याबाबत बोलताना मनोज जरांगे म्हणाले, "देवेंद्र फडणवीसांना हे माहिती नाही की याआधी १३ ते १४ वर्षात काहीच झालं नाही. मग असं अचानक काय झालं? मग मीच का? असे राज्यात किती गुन्हे आहेत? कारण दोन्हीही खाते तुमच्याकडे आहेत. मी गोरगरीबांसाठी लढतो म्हणून तुम्ही मला हेरलं का?

घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं राहिल, मी आता एवढंच सांगतो", असा इशारा मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिला. गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलांच चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी राज्य सरकारकडे केलेली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी मनोज जरांगे यांनी केलेली आहे. मात्र, त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजाने विरोध केला आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांसदर्भात लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केलेली आहे. सध्या मराठा आणि ओबीसी नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा तापला आहे. अशातच मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात एका प्रकरणात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. यावरून मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला. मला कारागृहात टाकल्यास भाजपाच्या सर्व उमेदवारांना निवडणुकीत पाडा, असं विधान मनोज जरांगे पाटील यांनी केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यावर प्रतिक्रिया दिली होती. यानंतर आज पुन्हा मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना इशारा दिला.

---

# अनिल देशमुख तेव्हा काय झोपले होते का?

## गिरीश महाजनांचा अनिल देशमुखांवर हल्लाबोल

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. अनिल देशमुख यांच्याविरुद्ध ईडी आणि सीबीआयने कारवाई केल्यानंतर त्यांना तुरुंगात जावं लागलं होतं. १३ महिन्याच्या तुरुंगावासानंतर त्यांची जामीनावर सुटका झाली होती. मात्र, या प्रकरणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं षडयंत्र होतं, असा गंभीर आरोप देशमुखांनी केला होता.**





यातच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संयोजक प्रा.श्याम मानव यांनी यावर भाष्य केलं आणि हे प्रकरण पुन्हा चर्चेत आलं.प्रा.श्याम मानव यांनी केलेल्या विधानाला अनिल देशमुखांनी दुजोरा दिला. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही इशारा देत अनिल देशमुखांचं रेकॉर्डिंग माझ्या हाती आहे, असं विधान केलं. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. आता भाजपाचे नेते, गिरीश महाजन यांनीही या प्रकरणावरून अनिल देशमुख यांच्यावर हल्लाबोल

### त्यांना आज का जाग आली?

याची कल्पना आम्हाला आहे. कारण जळगावचे तत्कालीन पोलीस अधीक्षक प्रवीण मुंढे यांनी सांगितलं की, अनिल देशमुखांनी त्यांच्यावर किती दबाव टाकला होता. गिरीश महाजन यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करा. आता पुण्याला घडलेला गुन्हा तीन वर्षांनी मुक्ताईनगर येथे दाखल करा. यासाठी देशमुखांनी किती दबाव पोलीस अधीक्षक मुंढेंवर टाकला होता. हे वेळोवेळी आम्हालाही समजलं आहे. एवढंच नाही तर तुला सस्पेंड करेल अशा धमक्याही त्यांना अनिल देशमुखांनी दिल्या होत्या. शेवटी तो गुन्हा माझ्यावर त्यांनी नाईलाजाने दाखल केला.

केला. 'अनिल देशमुख हे आता बोलत आहेत, आरोप करत आहेत. मात्र, ते तेव्हा काय झोपले होते का?', अशा शब्दांत गिरीश महाजन यांनी देशमुखांवर टीका केली.अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, "अनिल देशमुख तेव्हा काय झोपले होते का? त्यांना आज का जाग आली? पण त्यांना आता जाग का आली?

# कंगना रणौत यांची खासदारकी धोक्यात?

## मंडीतील निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हिमाचल प्रदेशच्या मंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपा खासदार कंगना रणौत अडचणीत सापडल्या आहेत. त्यांच्या निवडीला हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून त्यांना न्यायालयाने नोटीस पाठवली आहे. नोटीस जारी करत न्यायमूर्ती ज्योत्स्ना रेवाल यांनी कंगना रणौत यांच्याकडून २१ ऑगस्टपर्यंत उत्तर मागितले आहे.**



विहित निकषांची पूर्तता करूनही त्यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला, असा युक्तिवाद त्यांनी या याचिकेद्वारे केला आहे. अशा परिस्थितीत कंगना रणौत यांची निवडणूक रद्द करावी, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे.रिटर्निंग ऑफिसरवर ठपका ठेवत त्यांना या प्रकरणात पक्षकार बनवण्याची मागणी करण्यात आली आहे. लायक राम नेगी हे वनविभागाचे माजी कर्मचारी आहेत. त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेतली आणि उमेदवारी अर्ज भरताना रिटर्निंग ऑफिसरकडे थकीत नसलेली प्रमाणपत्रेही सादर केले. वीज, पाणी, दूरध्वनी आदी विभागांकडून थकीत नसलेली प्रमाणपत्रे घेण्यासाठी एक दिवसाची मुदत देण्यात आली होती. मात्र, नेगी यांनी सर्व दाखले सादर केले असता, निवडणूक अधिकाऱ्यांनी ती फेटाळून लावल्याचा दावा केला जात आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १०० अन्वये याचिका फेटाळली जाऊ शकते. जर याचिकाकर्त्याने आपला उमेदवारी अर्ज बेकायदा दाखल केला होता हे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्यास मंडीतील निवडणुकीला दिलेले आव्हान अवैध ठरवले जाऊ शकते नाकारले.अभिनेत्री कंगना रणौत आधीपासूनच नरेंद्र मोदींची चाहती राहिली आहे. त्यामुळे तिला मंडी लोकसभा मतदारसंघातून तिकीट मिळाल्यावर फारसे कुणाला आश्चर्य वाटले नाही. या निवडणुकीमध्ये तिच्याविरोधात काँग्रेसचे उमेदवार विक्रमादित्य सिंह यांचे आव्हान होते. मात्र, कंगनाने या निवडणुकीमध्ये ५,३७,०२२ मते मिळवून ७४,७५५ मताधिक्याने विजय प्राप्त केला. काँग्रेसचे उमदेवार विक्रमादित्य सिंह हे रामपूर संस्थानाच्या राजघराण्याचे वंशज आणि हिमाचलचे सहा वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या विदर्भ सिंह यांचे सुपुत्र आहेत. त्यामुळे त्यांचे पारडेही तसे जड मानले जात होते. मात्र, कंगनाने नरेंद्र मोदींच्या नावावर प्रचार करून या निवडणुकीत यश मिळवले. या विजयानंतर कंगनाने म्हटले आहे, “या समर्थन, प्रेम व विश्वासासाठी मंडीतील सर्व लोकांचे मनापासून आभार. हा तुम्हा सर्वांचा विजय आहे, हा पंतप्रधान मोदीजी व भाजपवरील विश्वासाचा विजय आहे, हा सनातनचा विजय आहे, हा मंडीच्या सन्मानाचा विजय आहे.” चित्रपट अभिनेत्री कंगना रणौत ही नुकतीच भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर हिमाचल प्रदेशच्या मंडी लोकसभा मतदारसंघातून निवडून आली आहे. कंगना रणौतच्या संसद प्रवेशाचीही जोरदार चर्चा झाली होती. कंगनानं यंदाच्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात घेतलेली खासदारकीची शपथदेखील चर्चेत राहिली होती. मात्र, संसदेचं अधिवेशन सुरू होऊन जवळपास महिना लोटल्यानंतर कंगना रणौतला गुरुवारी पहिल्यांदा बोलण्याची संधी देण्यात आली. पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात अर्थसंकल्पावर चर्चा चालू आहे. यादरम्यान, कंगना रणौतनं लोकसभेत आपलं पहिलं-वहिलं भाषण केलं. अगदी काही मिनिटांच्या या भाषणात कंगना रणौतनं तिच्या मंडी मंतदारसंघातले दोन मुद्दे सभागृहासमोर मांडले. तसेच, या मुद्द्यांबाबत केंद्र सरकारकडून नेमकी काय पावलं उचलली जात आहेत? असा प्रश्न कंगना रणौतनं केला.कंगनानं तिच्या भाषणाच्या सुरुवातीला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचे आभार मानले. “अध्यक्ष महोदय, तुमचे मंडीच्या जनतेच्या वतीने आभार मानते की तुम्ही आज पहिल्यांदा मला या सभागृहात मंडी लोकसभा मतदारसंघाबाबत बोलण्याची संधी दिली”, असं कंगना रणौत म्हणाली. विशेष म्हणजे कंगना बोलत असताना सभागृहात कुणीच व्यत्यय आणला नाही वा गोंधळ घातला नाही. यानंतर कंगनानं हिमाचल प्रदेशमधील घर बनवण्याची कला किंवा लोकरीपासून कपडे विणण्याची कला लुप्त होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. “मंडीमध्ये अशा अनेक कला आहेत.

### काय म्हणाली कंगना रणौत?

ज्या विलुप्त होत चालल्या आहेत. हिमाचल प्रदेशमध्ये काथ-कुनी नावाची एक घर बनवण्याची पद्धत वा कला आहे. तिथे मेंढ्या व याकच्या लोकरीपासून जॅकेट, टोप्या, शॉल, स्वेटर अशा अनेक गोष्टी बनवल्या जातात. विदेशात या वस्तूंना खूप मोठी किंमत मिळते. पण आपल्या देशात या कला पूर्णपणे लुप्त होत चालल्या आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारकडून कोणती पावलं उचलली जात आहेत?” स्पिती, किनौर किंवा भरमौरच्या क्षेत्रात हे स्थानिक लोकसंगीत आढळतं. तिथल्या आदिवासी जमातींमधील कपड्यांच्या प्रकारांप्रमाणेच हे संगीतही विशेष आहे. असा प्रश्न कंगना रणौतनं संसदेतील तिच्या पहिल्या-वहिल्या भाषणात सरकारला विचारला.

# कावड यात्रा वादावरून भारताला घेरण्याचा प्रयत्न

## अमेरिकन प्रवक्त्याकडून पाकिस्तानी पत्रकाराची बोलती बंद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमधील कावड यात्रा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सरकारच्या एका निर्णयामुळे वादात सापडली होती. कावड यात्रेच्या मार्गावरील सर्व दुकानांवर त्यांच्या मालकांच्या नावांच्या पाट्या ठळक अक्षरात लावण्याचे आदेश योगी सरकारने दिले होते. हा आदेश समाजात धार्मिक दुही निर्माण करणारा असल्याचे सांगत या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं गेलं.**




त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली. या अंतरिम आदेशामुळे या वादावर तूर्तास पडदा पडला आहे असं वाटत होतं. मात्र हा वाद आता केवळ उत्तर प्रदेशपुरता मर्यादित राहिलेला नाही. एका पाकिस्तानी पत्रकाराने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेला आहे.एका पाकिस्तानी पत्रकाराने हा मुद्दा अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयासमोर उपस्थित करत भारताला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. मात्र अमेरिकन परराष्ट्र मंत्रालयाने यावर रोखठोक उत्तर देत पाकिस्तानी पत्रकाराची बोलती बंद केली.अमेरिकेने म्हटलं आहे की “दुकानदारांना त्यांच्या दुकानांवर नावाच्या पाट्या लावण्याचा आदेश अद्याप लागू करण्यात आलेला नाही. कारण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्यावर स्थगिती दिली आहे.” अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांना पत्रकार परिषदेत पाकिस्तानी पत्रकाराने प्रश्न विचारला की “भारतीय प्रसारमाध्यमांवर एक बातमी पाहायला मिळत आहे.

### पाकिस्तानी पत्रकाराची बोलती बंद

तिथलं भाजपा सरकार मुसलमानांना त्यांच्या खाद्यपदार्थांच्या दुकानांवर त्यांचं मुस्लिम नाव लिहिण्यास भाग पाडत आहे. भारतातील वाढता मुस्लिम द्वेष तिथल्या मुस्लिमांसमोर अडचणी निर्माण करू शकतो. कोणत्याही सरकारच्या अशा प्रकारच्या कारवाईवर तुमचं मत काय?” यावर उत्तर देताना मिलर म्हणाले, आम्ही याबाबतचं वृत्त पाहिलं आहे. मात्र भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने २२ जुलै रोजी अशा प्रकारचा आदेश लागू करण्यावर स्थगिती दिली आहे. त्यामुळे सध्या तो आदेश प्रभावी नाही. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते म्हणाले, आम्ही (अमेरिका) नेहमी सांगत आलो आहोत .

# मुकेश ऋषी यांनी सांगितला शूटिंगदरम्यानचा 'तो' किस्सा



बॉलीवूडचे कलाकार सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांमुळे कधी त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे तर कधी त्यांच्या वक्तव्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता बॉलीवूडचे दिग्गज कलाकार मुकेश ऋषी यांनी धर्मेंद्र यांच्याबद्दलची एक आठवण सांगितली आहे.'रेडिओ नशा ऑफिशिअल'ला मुकेश ऋषी यांनी मुलाखत दिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, धर्मेंद्र हे असे अभिनेते आहेत, ज्यांचे पोस्टर माझ्या कपाटात लावलेले असायचे आणि जेव्हा त्यांच्याबरोबर काम करण्याची वेळ आली तेव्हा ती गोष्ट माझ्यासाठी अविश्वसनीय होती. मला आठवतं, ते सीनच्या शूटिंगसाठी सेटवर आले. मला माहित होतं, धर्मेंद्र सेटवर आले आहेत. पण मी त्यांच्याबरोबर बोलण्यासाठी किंवा त्यांना पाहण्यासाठी गेलो नाही. मी माझ्या सीनसाठी स्क्रीप्ट पाठ करत होतो. मी सेटवर गेलो तेव्हा तिथे आधीच धर्मेंद्र होते पण त्यांच्याकडे पाहिलं नाही. सीन शूट झाला आणि मी धर्मेंद्र यांचे पाय धरले. मी सीन शूट होण्याची वाट बघत होतो. जर सीन शूट होण्याआधी मी त्यांना भेटलो असतो तर तो सीन व्यवस्थित शूट झाला नसता. मला त्यांच्याप्रति खूप आदर होता आणि त्यामुळे मी त्यांच्यासमोर तो सीन नीट करू शकलो नसतो. मोठ्या लोकांना कसे सामोरे जायचे या गोष्टी शिकल्या होत्या. हे सगळं शिकवणारा दुसरा कोणताही कोर्स उपलब्ध नाही. तुम्हाला स्वत:लाच काही गोष्टी शिकायला लागतात. मोठ्या लोकांना सामोरे जाण्याचा आणि त्यांच्याबरोबर काम करण्याचा हा माझा मार्ग होता आणि मी असेच दिग्गज लोकांना सामोरे जायचो. असे या मुलाखतीत मुकेश ऋषी यांनी म्हटले आहे. खलनायकाच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनात वेगळी जागा निर्माण केली आहे.मुकेश ऋषी यांनी ९० च्या दशकात धर्मेंद्र यांच्यासोबत अनेक चित्रपटात काम केले आहे. त्यांचा पहिला चित्रपट अनिल कपूरची मुख्य भूमिका असलेला १९९२ साली प्रदर्शित झालेला हमला हा चित्रपट होता.

# माझ्या कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न!

बॉलीवूडचा भाईजान म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सलमान खान हा आपल्या चित्रपटांमुळे सतत चर्चेत असतो. मात्र, आता बिश्नोई गँगवर केलेल्या वक्तव्यामुळे तो मोठ्या प्रमाणात चर्चेत आला आहे.पीटीआय (PTI)च्या रिपोर्टनुसार, सलमान खानच्या घरावर गोळीबार झाल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी चार्जशीट फाइल केली होती. त्यावेळी सलमान खानने स्टेटमेंटमध्ये त्याच्या घरावरील गोळीबाराला लॉरेन्स बिश्नोई गँग जबाबदार असल्याचे म्हटले आहे. पुढे तो म्हणतो, "१४ एप्रिलला झोपेत असताना फायरक्रॅकरसारखा आवाज ऐकला. हा हल्ला मला आणि माझ्या कुटुंबाला मारण्यासाठी केला गेला होता. त्याच्या बॉडीगार्डने त्याला ४:५५ वाजता मोटरसायकलवरून आलेल्या दोघांनी पहिल्या मजल्यावर गोळ्या झाडल्याची माहिती दिली होती. त्याआधीही मला आणि माझ्या कुटुंबाला मारण्याचा प्रयत्न केला होता. माझ्या बॉडीगार्डने वांद्रे पोलिस ठाण्यावर याची तक्रार दाखल केली होती. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि त्याचा भाऊ अनमोल बिश्नोई यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेतल्याचे फेसबुकवरून समजले होते. गेल्या काही वर्षांत अनेकदा मला आणि माझ्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. त्यामुळे माझा विश्वास आहे की, लॉरेन्स बिश्नोईने त्याच्या गँगमधील लोकांच्या मदतीने माझे कुटुंब जेव्हा झोपलेले होते, तेव्हा घरावर गोळीबार केला. मला व माझ्या कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न केला."२०२२ मध्ये सलमानला धमकीचे पत्र सापडले होते. मार्च २०२३ मध्ये लॉरेन्स बिश्नोई गँगकडून धमकीचा मेल आला होता. जानेवारी २०२४ मध्ये त्याच्या पनवेलजवळील फार्महाऊसमध्ये दोन अज्ञात लोकांनी ओळख बदलून प्रवेश केला होता. जुलै महिन्याच्या सुरुवातीला पोलिसांनी गोळीबारप्रकरणी १७३५ पानांचे आरोपपत्र महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्याच्या प्रकरणांसाठी विशेष न्यायालयासमोर दाखल केले. अटक करण्यात आलेल्या सहा आरोपींविरुद्ध कारवाई करण्याइतपत पुरावे असल्याचे नमूद करीत न्यायालयाने दाखल केले गेलेले हे आरोपपत्र नुकतेच मान्य केले असल्याचेदेखील सलमानने म्हटले आहे. विक्कीकुमार गुप्ता, सागरकुमार पाल, सोनूकुमार बिश्नोई, अनुजकुमार थापन, मोहम्मद रफिक चौधरी व हरपाल सिंग अशी अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे आहेत.बॉलीवूडचा भाईजान म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सलमान खान हा आपल्या चित्रपटांमुळे सतत चर्चेत असतो. मात्र, आता बिश्नोई गँगवर केलेल्या वक्तव्यामुळे तो मोठ्या प्रमाणात चर्चेत आला आहे.



# माधुरीने बनवली कांदा भजी!

पावसाळा आला की, प्रत्येकाला चमचमीत पदार्थ खाण्याची इच्छा होते. थंडगार वातावरणात कांदा भजी, वडापाव, पाणीपुरी, मिसळ असे पदार्थ हवेहवेसे वाटतात. परंतु, अलीकडच्या धकाधकीच्या जीवनात बहुतांश लोक आरोग्याची काळजी असल्याने अशा तेलकट पदार्थांपासून दूर राहतात. या सगळ्यांसाठी खास 'धकधक गर्ल' माधुरी दीक्षितने ऑइल फ्री कांदा भजीची रेसिपी सांगितली आहे. अभिनेत्रीने तिचे पती डॉ. नेने यांच्या युट्यूब चॅनेलवर एकूण कांदा भजीचे पाच प्रकार करून दाखवले आहेत. यामुळे आरोग्य जपणाऱ्या लोकांना निश्चितच फायदा होईल असं डॉ. नेने या व्हिडीओमध्ये सांगत असल्याचं पाहायला मिळत आहे.९० चं दशक गाजवणारी हरहुन्नरी अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितला ( MADHURI DIXIT ) ओळखलं जातं. धकधक गर्लने तिच्या सहज-सुंदर अभिनयाने सर्वांना भुरळ पाडली. आजही तिच्या अभिनयाचे व नृत्याचे लाखो चाहते आहे. करिअरच्या शिखरावर असताना माधुरीने १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्नगाठ बांधली. यानंतर अभिनेत्री अमेरिकेत संसारात रमली. पुढे काही वर्षांनी भारतात परतल्यावर माधुरी पुन्हा एकदा मनोरंजन विश्वात सक्रिय झाली. नुकतीच माधुरीने खास पावसाळ्यानिमित्त डॉ. नेनेंबरोबर कांदा भजी बनवली आहे.



# ३ सेकंदात होकार

बॉलीवूडचा 'सिंघम' अर्थात अजय देवगण सध्या 'औरों में कहां दम था' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून अजय व तब्बूची एव्हरग्रीन जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यानिमित्ताने या दोघांनी 'लल्लनटॉप'च्या मुलाखतीला उपस्थिती लावली होती. यावेळी अजय देवगणने त्याच्या आयुष्यातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्याचा आजवरचा बॉलीवूड प्रवास, पहिला राष्ट्रीय पुरस्कार याबद्दल अजयने या मुलाखतीत भाष्य केलं आहे.अजय देवगणने ( AJAY DEVGN) १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फूल और काँटे' चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच गाजला. यानंतर त्याने अनेक चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला.

# जावेद अख्तर यांची 'ॲनिमल' चित्रपटावर टीका

बॉलीवूडचे प्रसिद्ध गीतकार व लेखक जावेद अख्तर सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. त्यांच्या कामाबरोबरच त्यांच्या स्पष्ट वक्तव्यामुळे ते मोठ्या चर्चेत असतात. आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत, अँग्री यंग मॅन संकल्पना आणि रणबीर कपूरच्या 'ॲनिमल' चित्रपटाविषयी भाष्य केले आहे.संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करीत धुमाकूळ घातला होता. मात्र, अनेकांकडून या चित्रपटावर मोठी टीकादेखील झाली होती. आता जावेद अख्तर यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्यांना चित्रपटातील 'अँग्री यंग मॅन' संकल्पनेबद्दल प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, "एखादी व्यक्तिरेखा कोणताही उद्देश नसताना रागात असल्याचे दाखवली, तर तिचे रूपांतर व्यंगचित्रात होते आणि 'ॲनिमल'सारखा चित्रपट निर्माण होतो. मी आणि सलीम खानने १९७० च्या दशकात अनेक चित्रपटांतील नायकांच्या भूमिका या 'अँग्री यंग मॅन'साठी लिहिल्या आहेत. मात्र, ते नायक प्रचलित व्यवस्थांविरुद्ध लढा द्यायचे, त्यांना त्याविषयी राग असायचा. व्यवस्थेविरुद्ध तरुणांमध्ये राग असणे ही 'अँग्री यंग मॅन'ची संकल्पना असायची. आणि वास्तवात त्याचा अवलंब करीत नाही, हे तरुणाई बघत असायची आणि त्यामुळे यावर सरकारला प्रश्न विचारत राहणे, हे काम तरुण लोक करीत असायचे.

# आम्ही कायम एकमेकांसाठी असतो!

## हार्दिकला चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले : बुमराह

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने इंडियन एक्सप्रेसच्या ‘एक्सप्रेस अड्डा’ कार्यक्रमात हजेरी लावली होती. या मुलाखतीत बुमराहने त्याच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल आणि इतर अनेक मुद्द्यांवर स्पष्टपणे भाष्य केले. यादरम्यान हार्दिक पंड्याकडे आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्स संघाचे कर्णधारपद दिले होते. यानंतर हार्दिकला चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. पण या सगळ्यादरम्यान मुंबई इंडियन्सच्या संघात कसे वातावरण होते, यावर जसप्रीत बुमराहने वक्तव्य केले आहे.**




### पंड्यावर बुमराहचं मोठं वक्तव्य

आम्ही सर्वजण विरूद्ध जग असं होतं. आम्ही सर्वजण तेव्हा एकत्र होतो आणि जेव्हा जेव्हा त्याला गरज असेल तेव्हा आम्ही त्याच्यासोबत राहून त्याला मदत करण्याचा प्रयत्न केला.” असे बुमराहने सांगितले. आयपीएल २०२५ पूर्वी मेगा लिलाव होणार आहे. या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सचा संघ कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार आणि कोणत्या खेळाडूंना रिलीज करणार यावर सर्वांच्या नजरा आहेत. भारतीय क्रिकेट संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने इंडियन एक्सप्रेसच्या ‘एक्सप्रेस अड्डा’ कार्यक्रमात हजेरी लावली होती. या मुलाखतीत बुमराहने त्याच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल आणि इतर अनेक मुद्द्यांवर स्पष्टपणे भाष्य केले. यादरम्यान हार्दिक पंड्याकडे आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्स संघाचे कर्णधारपद दिले होते. यानंतर हार्दिकला चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते.

पाच वेळचा आयपीएल चॅम्पियन कर्णधार रोहित शर्माच्या जागी हार्दिक पंड्याला मुंबई इंडियन्सचा कर्णधार करण्यात आले. पण हा निर्णय चाहत्यांना न पटल्याने चाहत्यांनी त्याची चांगलीच हुर्यो उडवली. हार्दिकसह घडत असणारं हे प्रकरण सारेच पाहत होते पण कोणीच यावर भाष्य केले नाही. हार्दिक संघाचा कर्णधार झाल्यानंतर ड्रेसिंग रूममध्ये दोन गट पडले होते अशी चर्चा सुरू होती. पण त्यादरम्यान खरंच संघात नेमके कसे वातावरण होते, हे बुमराहने सांगितले आहे. हार्दिकची हुर्यो उडवली जात असताना संघात कसं वातावरण होतं, हे सांगताना बुमराह म्हणाला, “कधीकधी आम्हीही समजून घेतो की, आपण अशा देशात राहतो जिथे भावनांना अधिक महत्त्व आहे. आम्हालाही कळतं की चाहते भावनिक आहेत ते भावूक होतात. खेळाडूही भावनिक होतात. पण आपले चाहतेच तुमच्याबद्दल चांगलं बोलत नाहीयत याचा परिणाम एक भारतीय खेळाडू म्हणूनही होतो. पण आपल्याला खंबीरपणे याला सामोरे जावे लागते. आपण जर स्वत:वर लक्ष दिलं, आपल्या कामगिरीवर लक्ष दिलं तर आपण या सर्व गोष्टी नक्कीच परतवून लावू शकतो. पण हे सर्व सोपं नव्हतं. चाहते पावलोपावली त्यांचा राग व्यक्त करत होते, जो स्पष्टपणे ऐकू येत होता, जाणवत होता.” यावर पुढे बुमराह म्हणाला, “पण अशावेळेस तुमचे सहकारी कायम सोबत असतात. एक संघ म्हणून आम्ही त्या गोष्टींना अजिबात प्रोत्साहन दिले नाही. एक संघ म्हणून आम्ही कायम त्याच्यासोबत होतो. आम्ही त्याच्याशी संवाद साधत होतो. त्याचं कुटुंब कायम त्याच्या पाठिशी होतं. काही गोष्टी या आपल्या नियंत्रणापलीकडे असतात. पण आम्ही वर्ल्डकप जिंकताच हे चित्रही बदलले.” “तुम्ही कायम आपल्याला आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी गांभीर्याने घेऊ शकत नाही. आताच्या घडीला लोक तुमचं गुणगान गात आहेत. पण आम्ही एखादा सामना गमावला तर हे चित्र पुन्हा बदलू शकतं. कारण आम्ही एक असा खेळ खेळत आहोत, जो खूप जास्त लोकप्रिय आहे आणि त्यामुळे प्रत्येक खेळाडूला यातून जावचं लागतं. फुटबॉलमध्ये पण आपण पाहतो की चाहते खेळाडूंची हुर्यो उडवतात. जगातील उत्कृष्ट खेळाडूंना या गोष्टीला सामोरे जावे लागते. हा सर्व एका खेळाडूच्या प्रवासाचा भाग आहे. पण या खेळात काही चांगल्या गोष्टीही आहेत.” “एक संघ म्हणून एखाद्या खेळाडूला आम्ही असंच एकटं सोडू शकत नाही. आम्ही कायम एकमेकांसाठी असतो. आम्ही नेहमीच एकमेकांना मदत करण्याचा प्रयत्न करत असतो. मी हार्दिकसोबत बराच काळ क्रिकेट खेळलो आहे.

# तिरंदाजीत भारताच्या लेकींनी केली  कमाल

## पहिल्याच खेळात यश संपादन करत उपांत्यपूर्व फेरीत धडक

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज म्हणजेच २५ जुलैपासून भारताच्या खेळांना सुरूवात झाली आहे. आज महिला तिरंदाजी स्पर्धेची रँकिंग फेरी पार पडली. भारताकडून तीन तिरंदाजांनी यात सहभाग घेतला पण कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. भारतीय तिरंदाजांमध्ये माजी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या दीपिका कुमारीकडून सर्वाधिक अपेक्षा होत्या पण ती मागे पडली. मात्र, ही सांघिक स्पर्धा होती आणि असं असताना भारताच्या या तिन्ही महिला तिरंदाजांनी एकूण कामगिरी चांगली करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.**




### संघाची उपांत्यपूर्व फेरीत मारली धडक

त्यांच्या खालोखाल भजन कौर हिने ६५९ गुणांसह २२ वे स्थान पटकावले. दीपिका कुमारी अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकली नाही आणि ती ६५८ गुणांसह २३व्या स्थानावर राहिली.पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज म्हणजेच २५ जुलैपासून भारताच्या खेळांना सुरूवात झाली आहे. आज महिला तिरंदाजी स्पर्धेची रँकिंग फेरी पार पडली. भारताकडून तीन तिरंदाजांनी यात सहभाग घेतला पण कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. भारतीय तिरंदाजांमध्ये माजी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या दीपिका कुमारीकडून सर्वाधिक अपेक्षा होत्या पण ती मागे पडली. मात्र, ही सांघिक स्पर्धा होती आणि असं असताना भारताच्या या तिन्ही महिला तिरंदाजांनी एकूण कामगिरी चांगली करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. दीपिका कुमारी व्यतिरिक्त भारताकडून अंकिता भगत आणि भजन कौर सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत एकूण ६४ तिरंदाजांचा सहभाग होता. अव्वल चार संघांना थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळणार होता.

दीपिका कुमारी व्यतिरिक्त भारताकडून अंकिता भगत आणि भजन कौर सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत एकूण ६४ तिरंदाजांचा सहभाग होता. अव्वल चार संघांना थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळणार होता आणि टीम इंडियाने चौथ्या स्थानी येत उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले.रँकिंग फेरीत दीपिका, भजन आणि अंकिता या भारतीय त्रिकुटाने चमकदार कामगिरी करत एकूण १९८३ गुण मिळवले आणि पहिल्या चारमध्ये स्थान मिळवत उपांत्यपूर्व फेरीचे तिकिट बुक केले. भारताशिवाय दक्षिण कोरिया, चीन आणि मेक्सिकोचे संघही पहिल्या चारमध्ये आहेत. कोरियाच्या महिला संघाने २०४६ गुण, चीनने १९९६ गुण आणि मेक्सिकोच्या संघाने १९८६ गुण मिळवले आणि हे तिन्ही संघ भारतापेक्षा पुढे होते. भारतीय तिरंदाजांच्या वैयक्तिक गुणांमध्ये अंकिता भक्त सर्वात अचूक होती. तिने अचूक तिरंदाजी करत एकूण ६६६ गुण मिळवले आणि ती ११व्या क्रमांकावर राहिली.